# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : ६
## <u>सभावृत्तांत</u>

दिनांक : १८/९/२००९ वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दि.१८/९/२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
३. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
४. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
५. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.काळे - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक : मा.सिध्देश्वर बारणे

शनिवार दिनांक ३/१०/२००९ रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

मा.सभापती :- शनिवार दि.३/१०/२००९ रोजी दुपारी १:४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

----------

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ६
सभावृत्तांत
(दिनांक १८/९/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक : ३/१०/२००९ वेळ : दुपारी १:४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक १८/०९/२००९ ची तहकुब सभा शनिवार दि.३/१०/२००९ रोजी दुपारी १.४५ वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे

याशिवाय मा.काळे - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती : सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने शुक्रवार दि.६/११/०९ रोजी दु.१.३० पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : ६
## सभावृत्तांत
(दिनांक १८/९/२००९ व ३/१०/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक : ६/११/२००९ वेळ : दुपारी १:३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ३/१०/२००९ची तहकुब सभा शुक्रवार दि.६/११/२००९ रोजी दुपारी १.३० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
३. मा.एकनाथ मोटे
४. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
५. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
७. मा.खोमणे लता हनुमंत
८. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
९. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.देशमुख - सहा.आयुक्त,मा.चाकणकर -उपनगरसचिव, मा.बनकर,मा.कपिले,मा.ढगे,मा.इंगळे,मा.निकम - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.एकनाथ मोटे अनुमोदक : मा.सिध्देश्वर बारणे

पिंपरी चिंचवड शहरामध्ये अपुरा पाणीपुरवठा होत असुन विशेषत: वॉर्ड क्र.१८,३४,७६,७७ व ९९ मध्ये पाणी पुरवठा सुरळीत होत नसल्याने शुक्रवार दिनांक १३/११/२००९ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

मा.सभापती :- शुक्रवार दि.१३/११/२००९ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : ६
<u>सभावृत्तांत</u>
(दिनांक १८/९/२००९,३/१०/२००९ व ६/११/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक : १३/११/२००९ वेळ : दुपारी २:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक ६/११/२००९ची तहकुब सभा शुक्रवार दि.१३/११/२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

याशिवाय मा.चाकणकर -उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.सभापती : सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने शुक्रवार दि.२०/११/०९ रोजी दु.१.०० पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिति
कार्यपत्रिका क्रमांक : ६
<u>सभावृत्तांत</u>
(दिनांक १८/९/२००९,३/१०/२००९,६/११/२००९ व १३/११/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक : २०/११/२००९ वेळ : दुपारी १:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक १३/११/२००९ची तहकुब सभा शुक्रवार दि.२०/११/२००९ रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
४. मा.खोमणे लता हनुमंत
५. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
६. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.पवार - प्रशासन अधिकारी,मा.चाकणकर -उपनगरसचिव, मा.थोरात,मा.बनकर,मा.कपिले,मा.जाधव - कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

दिनांक ०४.०९.२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक :- १६५ विषय क्रमांक :- १
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.प्रकाश बाबर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कअ/बमु/३१/०९ दि.३१.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.३१ अक्षय सोसायटी, ५५५ सोसायटी व भाजीमंडई परिसरातील रस्ते हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी र.रु.१७,८०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १६६ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कअ/बमु/३२/०९ दि.३१.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.३१ मधील भाजीमंडई इमारतीमध्ये एल एस ओ २ कार्यालयामध्ये अंतर्गत सजावटीची कामे करणेकामी र.रु.१८,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १६७ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : स्थापत्य
सुचक :- मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कअ/बमु/३३/०९ दि.३१.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वाय.सी.एम.एच. हॉस्पीटलमधील पोस्टमार्टम सेंटरजवळ प्रतिक्षागृह बांधणेकामी र.रु.१२,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १६८ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : उद्यान
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.प्रकाश बाबर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/१/कावि/१८१/०९ दि.२४.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

देहूरोड कॅन्टोमेंट बोर्ड, जी.एल.आर. सर्व्हे नं.८२ श्रीकृष्णनगर येथील जागेत उद्यान विकसित करणे व एक वर्षे देखभाल करणेकामी र.रु.३४,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १६९ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/१२२०/०९ दि.४.९.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार १) श्रीम. लागू अमृता अशोक (खुला) व २) श्री.बंडागळे प्रदिप राजाराम (खुला [भटक्या जमाती (ब)] ) या कर्मचाऱ्यांना लेखापाल पदावर र.रु.६५००-१०५०० या वेतनश्रेणीत पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १७० विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २०/११/२००९ विभाग : प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/९७६/०९ दि.४.९.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निवड समितीने ताथवडे ग्रामपंचायत येथील प्रस्तावात नमुद एकुण ९ कर्मचा-यांना महापालिका सेवेमध्ये वर्ग ३ व ४ चे पदांवर सामावुन घेणेबाबतचा निर्णय घेतला असल्याने सदरच्या एकूण ०९ कर्मचाऱ्यांना तुर्तास ग्रामपंचायत दराने वेतन व भत्ते अदा करणेस तसेच त्यांचे मनपा सेवेमध्ये समावेशन केल्यामुळे त्यांना महापालिका आस्थापनेवरील पदांप्रमाणे वेतनश्रेण्या लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- १७१ विषय क्रमांक :- ७

दिनांक :- २०/११/२००९ विभाग : मध्यवर्ती साहित्य भांडार

सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मसाभां/०४/कावि/३९५/०९ दि.२८.८.०९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वैद्यकीय विभागाअंतर्गत मनपा दवाखाना/रुग्णालयातील भंगार साहित्य व निकामी झालेले हायपोसोलुशन निविदा नोटीस क्रमांक -१६/२००५-२००६ नुसार जादा दराचे ठेकेदार मे.गॅब ॲडव्हरटायझिंग यांचेकडून प्राप्त झालेल्या निविदा दरानुसार त्यांचेसमवेत झालेल्या करारनाम्यास अधिन राहून पुढील दोन वर्ष कालावधीकरीता विक्री करण्यास त्यांचे समवेत परत करारनामा करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/१२७५/०९

दिनांक- २३/११/२००९ चे लगत सही/-

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.